CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ५ एप्रिल २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १८६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


**१७ वा सामना**

चेन्नई सुपरकिंग्ज वि. दिल्ली कॅपिटल्स्

वेळ : ७.३० वा. स्थळ : चेन्नई

## घरगुती भांडणातून पत्नीला बळजबरीने विष पाजले

✔ **सोलापूर** : घरगुती भांडणातून पत्नीला बळजबरीने विष पाजण्यात आले. ही घटना काटी (ता.तुळजापूर) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. अंजना पंचेश्वर राठोड (वय ४० रा. काटी ता.तुळजापूर) असे विषप्रयोग झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना सावरगाव येथे प्राथमिक उपचार करून निंबाजी पवार (वडील) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सकाळी आठच्या सुमारास घरगुती भांडणातून त्यांच्या पती पंचेश्वर राठोड हा मारहाण करीत त्यांना बळजबरीने कसले तरी विषारी द्रव पाजले होते. त्यांना त्रास होत असल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले. याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.


# पप्पा आत्महत्या करून कायमचे निघून गेले, आई जेलमध्ये गेली
# चिमुरड्या राजनंदिनी अन् अमृतावर पोरकेपणाची आफत आली!

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**मित्राचे नाते रक्ताच्या नात्यापेक्षादेखील भारी मानले जाते. पण दोघांमधली मैत्री तशी दृष्ट लागण्यासारखी असावी लागते. जीवाला जीव देणारी, एकाच्या पायात काटा रुतला जर दुसऱ्याच्या डोळ्यातून अश्रू येणारी, कृष्णा-सुदाम्याच्या आदर्शप्रमाणे मैत्री असावी लागते. मैत्रितच गद्दारी आणि विश्वासघात असेल तर... होय, उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा भूमीत मित्रानेच मित्राचा विश्वासघात करावा, त्यातून मित्राला आत्महत्येमधून स्वत:चे आयुष्य संपवावं लागावे, अशी अप्रिय घटना घडली आहे. मित्राने आपल्या मित्राच्या बायकोवर वाईट नजर ठेवली. तिच्याशी प्रेमसंबंध जुळविले आणि घात केला, असाच प्रकार झाला आहे.**



- वडाळ्यात मित्रानेच मित्राचा केला विश्वासघात
- पत्नीसह प्रियकराच्या त्रासाला कंटाळून नवऱ्याची आत्महत्या
- घरातच साडीने फास घेऊन संपविले स्वत:चं आयुष्य
- प्रेमप्रकरणाने मोडला राजा-राणीचा संसार



दरम्यान, मैत्रीमध्ये जो विश्वासघातकीपणा झाला, त्यातून आख्खं कुटुंब उद्ध्वस्त झालं. राजा-राणीचा सोन्याचा संसार मोडला. जी घटना घडली त्यामधून जन्मदाता पिता आपल्या दोघी चिमुरड्यांना सोडून या जगातून कायमचा निघून गेला. तर संशयित दोषी आईला शिक्षा भोगण्यासाठी जेलमध्ये जावे लागले. घडलेल्या भयंकर घटनेमधून दोघी चिमुरड्या आई-वडिलांविना पोरक्या झाल्या.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर, शुक्रवार (ता.४) सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला अन् कुटुंब उद्ध्वस्त होण्यासंबंधी जे काही घडले ते समोर आले. याप्रकरणी विश्वास भिमराव पवार (रा. वडाळा) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, श्रीकृष्ण विश्वास पवार (वय ३२, रा. वडाळा, ता. उत्तर सोलापूर) हा तरुण शेती व्यवसाय करीत होता. निकिता असं त्याच्या पत्नीचं नाव आहे. राजनंदिनी (वय ३) आणि अमृता (वय दीड वर्षे) या दोन मुली त्यांना आहेत. गावातील बालाजी भगवान पाटील हा श्रीकृष्ण पवार यांचा मित्र होता. दोघांमध्ये मैत्री असल्यामुळे बालाजी पाटील हा पवार यांच्या घरी अधूनमधून यायचा. पवित मैत्रीच्या नात्याला कलंक लावेल असे श्रीकृष्ण पवार यांना वाटले नव्हते.

मात्र, बालाजी पाटील याची वाईट नजर श्रीकृष्ण यांची पत्नी निकीता हिच्यावर पडली. दोघांमध्ये प्रेमसंबंध जुळले. अनैतिक संबंध प्रस्थापित झाले. मित्र बालाजी याने आपल्या पत्नीसोबत असं गैर वागणं श्रीकृष्ण याला अजिबात आवडत नव्हतं. मित्र बालाजी याने आपला विश्वासाने गळा कापला असं श्रीकृष्ण म्हणत होता. दरम्यान याच टप्यावर बालाजी आणि निकिता यांच्या अनैतिक संबंधाची पर्यायाने प्रेम प्रकरणाची वाईट चर्चा गल्लीत, गावात, नातेवाईकांमध्ये होत होती. याबद्दल श्रीकृष्ण याला संताप यायचा. पत्नी निकिता हिस बालाजीसोबतचे प्रेमसबंध तोडून टाक, असं श्रीकृष्ण सांगत होता. मात्र, बालाजी सोबतच्या प्रेमात अडकलेली निकिता काही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हती. बालाजीच्या प्रेम प्रकरणावरुन श्रीकृष्ण आणि निकिता यांच्यामध्ये सतत भांडणे होत होती. आपली बायको अर्थात आयुष्याची जोडीदारीन मित्र बालाजी याची झाली आहे, हे श्रीकृष्ण याला खटकत होतं. श्रीकृष्ण याने बालाजी यास समजाविण्याचा प्रयत्न केला. निकिता हिचा नाद सोडून दे, असे बजावले मात्र तोही ऐकत नव्हता. समाजात तर बायकोच्या प्रेमसंबंधावरुन बेअब्रु होत होती. बायको निकिता आणि मित्र बालाजी दोघे ऐकत नव्हते. शेवटी वैतागून श्रीकृष्ण पवार यानेच ३१ मार्च २०२४ रोजी घराच्या अँगलला साडीने गळा आवळून फास घेतला. पोलिसांच्या प्राथमिक तपासात ही माहिती समोर आली आहे.

### काही हाईलाईटस्...

- ✔ संशयित आरोपी निकिता पवार हिस अटक
- ✔ संशयित आरोपी बालाजी पाटील यांचा पोलिसांकडून शोध सुरु
- ✔ गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर, निकिता आणि बालाजी यांचे कॉल डिटेल्स तपासण्यात येणार
- ✔ संशयित आरोपी बालाजी हा चिंचोली एमआयडीसी परिसरातील आयशर नामक कंपनीत आहे नोकरीला
- ✔ संशयित बालाजी याचे काही दिवसांपूर्वीच झाले आहे लग्न

### दोघी चिमुरड्यांचा सांभाळ आजी-आजोबांसह काका करणार

पवार कुटुंबातील राजनंदिनी आणि अमृता या दोघी चिमुरड्या आई-वडिलांपासून पोरक्या झाल्या. त्यांचा सांभाळ आता त्यांचे आजी-आजोबा आणि दोघे चुलते हे करणार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

### प्रत्यक्ष पाहण्याबरोबरच कॉल डिटेल्सचा पुरावा

निकिता पवार आणि बालाजी पाटील यांच्यामध्ये मोबाईलवर बोलणं सुरु होतं. याचे कॉल डिटेल्स मृत श्रीकृष्ण पवार याने मिळविले होते. शिवाय या दोघांना अनेकवेळा एकत्र श्रीकृष्ण यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. त्यावरुन श्रीकृष्ण हे प्रेमसंबंध असल्याचा दावा करीत होते, अशी माहिती पोलीस सूत्रांकडून मिळाली.

### आत्महत्येबद्दल श्रीकृष्ण बोलला होता, पण...

पत्नी निकिता आणि मित्र बालाजी पाटील यांच्यामधील अनैतिक संबंध मृत श्रीकृष्ण पवार याला अजिबात मान्य नव्हते. बालाजी याचा नाद नाही सोडला तर मी आत्महत्या करीन असं भांडणात श्रीकृष्ण बायकोला म्हणत होता. आत्महत्येचा इशारा त्याने अनेकवेळा देऊनसुद्धा बायको निकिता हे बालाजीसोबतचे प्रेमसंबंध तोडायला तयार नव्हती, शेवटी त्याने आत्महत्येचा मार्ग निवडला असं पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले.

### पित्याने दिली फिर्याद...

श्रीकृष्ण पवार याने ३१ मार्च रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या संदर्भात त्याचे वडील विश्वास भिमराव पवार फिर्याद दिली. सून निकिता श्रीकृष्ण पवार आणि बालाजी पाटील यांच्यात अनैतिक संबंध होते. दोघांनी मिळून आपल्या मुलास शारीरिक आणि मानसिक त्रास दिला होता. त्यांच्या त्रासाला कंटाळून आपल्या मुलाने आत्महत्या केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. दाखल फिर्यादीवरुन निकिता पवार आणि बालाजी पाटील यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा भारतीय दंड संहिता कलम १०८, ३५२, ३४ (३) गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहायक निरीक्षक मनोज अभंग करीत आहेत.

### दोन संसार उद्ध्वस्त


निकिता आणि बालाजी हे दोघे अल्लड, अल्पवयीन आहेत असं अजिबात नाही. दोघांनाही समज आहे. संसार आहे. निकिता हिला तर दोन मुली आहेत. शिवाय बालाजी याचेपण लग्न झाले आहे. त्यालापण बायको, आई-वडिल, भाऊ वगैरे असे सगळे कुंटुंब आहे. नवऱ्याच्या आत्महत्या प्रकरणात निकिता जेलमध्ये सडणार त्यातून तिचा संसार उद्ध्वस्त झाला. शिवाय मित्र श्रीकृष्ण याच्या आत्महत्येला कारणीभूत ठरण्याप्रकरणी बालाजी हादेखील तुरुंगात सरकारी पाहुणचार घेणार. त्यातून त्याचाही संसार उद्ध्वस्त होणार. प्रेम प्रकरणातून दोन संसार उद्ध्वस्त झाले, हे मात्र नक्कीच.

## चक्कर येऊन पडल्याने तरुण दगावला

✔ **सोलापूर** : नवीन आरटीओ कार्यालयात जवळील अशोक नगराच्या वळणावर थांबला असता अचानक छातीत दुखून चक्कर आल्याने प्रफुल्ल रवींद्र गायकवाड (वय ३० रा. श्रीकृष्ण पार्क विजापूर रोड) हा उपचारापूर्वी मयत झाला. गुरुवारी रात्री १० वाजेच्या सुमारास तो अशोक नगर येथील वळणावर थांबला होता.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपल्याला काळजी आपल्या बोर्डाची !

| | |
|---|---|
| संगम श्री डे | 227-13-139 |
| संगम श्री नाईट | 370-06-880 |
| कल्याण | 169-62-138 |
| मुंबई | 134-82-499 |

# सांगोल्यात उडाले राजकीय आऊटगोळे
# गोरेंनी फोडला बॉम्ब, बापूंनी सोडले अग्निबाण



- नागरी सत्कार सोहळ्यात उडाली धमाल
- कितीही षडयंत्र करा, मी आधुनिक अभिमन्यू
- पालकमंत्र्यांचा नेमका इशारा कोणाला?

✔ सांगोला/प्रतिनिधी



**सांगोल्यातील गुरूवारी रात्री पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नागरी सत्काराचा कार्यक्रम भलताच रंगला. सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीमुळे प्रत्येक नेत्याने यावेळी राजकीय आऊटगोळे उडवले. त्यातून उपस्थितांची जबरदस्त धमाल उडाली. काही नेत्यांनी एकमेकांना राजकीय चिमटे घेतले तर काही नेत्यांनी एकमेकांना कोपरखळ्या मारल्या. त्यामुळे उपस्थितांमध्ये हास्याचे फवारे उडाले. गोरे यांनी पुन्हा विरोधकांना पुन्हा ललकार देवून कार्यक्रमात जणू ॲटमबॉम्बच फोडले तर माजी आमदार शहाजीबापू यांनी अग्निबाणच सोडले.**

सोलापूरचा दौरा आटोपून गोरे हे गुरूवारी रात्री सांगोल्याहून माणमधील आपल्या गावी निघाले होते. वाटेतच त्यांनी सांगोलेकरांचा नागरी सत्कार स्वीकारला. कार्यक्रमाला उशीर झाला. त्यात ही राजकीय धमाल उडाली. गेल्या काही दिवसांपासून गोरे हे विरोधकांना जोरदार प्रत्युत्तर देत आहेत. काही दिवसांपूर्वी गोरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर जोरदार टीका केली होती.

तसेच 'आपले राजकारण संपले तरी चालेल, पण मी शरद पवारांच्या पुढे कधीही झुकणार नाही', असे म्हणत गोरे यांनी टीका केली होती.

गोरे यांनी सांगोल्याच्या कार्यक्रमात बोलताना एक सूचक विधान केले आहे. 'कितीही षडयंत्र करा, पण मी आधुनिक अभिमन्यू आहे, देवेंद्र फडणवीस यांचा पठ्ठा आहे', असे गोरे यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानाचा रोख नेमके कोणाकडे होता? याबाबत आता राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहेत.

माझा ते पराभव करू शकले नाहीत. त्यांनी सर्व ताकद पणाला लावली. सर्व बाजूंनी मग त्यामध्ये पक्षामधून आणि पक्षाच्या बाहेरून ताकद लावली पण तरीही माझा पराभव करू शकले नाहीत. तेव्हा षडयंत्र रचण्याचा प्रयत केला. असे कितीतरी षडयंत्र रचले, कितीही चक्रव्यूह टाकले तरीही मी देखील आधुनिक अभिमन्यू आहे. देवेंद्र फडणवीस यांचा पठ्ठ्या आहे हे लक्षात ठेवा'', असा सूचक इशारा गोरे यांनी दिला आहे.

### शहाजीबापू पाटलांनी स्वत:च्या गालावर चापट मारून घेतली

माजी आमदार शहाजीबापू पाटील हे एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी शहाजी बापू पाटील यांनी भर सभेत स्वत:च्याच गालावर चापट मारून घेतली. त्यांच्या या कृतीने सभेत चांगलाच हशा पिकला. शहाजीबापू पाटील म्हणाले की, ''ज्यांनी पाणी अडवण्याचे काम केले, त्यांना तुम्ही खासदार म्हणून संसदेत पाठवले. पण ज्यांनी तुम्हाला पाणी दिले, त्यांना तुम्ही घरी बसवले. त्यामुळे आपल्याला देखील काहीतरी वाटायला पाहिजे, आपल्या या चुकीमुळे आपण तोंडात मारून घ्यायला पाहिजे'', असं म्हणत शहाजीबापू यांनी भरसभेत स्वत:च्या गालावर चापट मारून घेतली. शहाजी बापू पाटील यांच्या या कृतीवर सभेत एकच हशा पिकल्याचे पाहायला मिळाले.

### 'ही गोष्ट काळजाला लागली'

सांगोल्यातील पाण्याच्या मुद्यावर बोलताना शहाजीबापू म्हणाले की, ''काय माणसे आहोत आपण? आपण काय केले? ज्यांनी पाणी अडवले त्यांना खासदार केले आणि पाण्यासाठी ज्यांनी काम केले, त्याांना घरी बसवले. ही गोष्ट आपल्या काळजाला लागली. ओरडून ओरडून प्रश्न सुटत नाहीत. जनतेच्या विकासाची कामे करायची असतील तर सत्तेच्या जवळ असले पाहिजे', असेही मत शहाजी बापू पाटील यांनी यावेळी व्यक्त केलं.

## बाजार समिती निवडणूक
# माने यांचा इच्छुकांना वेट ॲन्ड वॉचचा सल्ला

✔ सोलापूर/प्रतिनिधी

बाजार समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी दिलीप माने गटाच्या इच्छुकांनी ब्रह्मदेवदादा माने यांच्या बँकेत एकच गर्दी केली. अनेकांनी आपल्याला एकदा संधी देण्याची मागणी केली. अनेकांनी माने यांना कोणता निर्णय घेणार याची विचारणा केली. तर सर्व इच्छुकांनी माने यांनी घेतलेला निर्णय मान्य असल्याचे सांगितले. माने यांनी सर्वांचे म्हणणे एकून घेत अजून १० दिवस वेळ आणि थोडे थांबा असे इच्छुकांना सांगितले. त्यामुळे आता माने काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी आमदार दिलीप माने यांची भेट झाल्यानंतर बाजार समिती निवडणुकीचा काय निर्णय होणार याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. गोरे आणि माने यांच्यात बाजार समिती निवडणुकीबाबत काहीतरी चर्चा झाली आहे. मात्र त्याचा तपशील बाहेर आला नाही. दुसरीकडे भाजपकडूनही निवडणुकीची तयारी सुरू आहे. आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे याची जबाबदारी आहे. मात्र तेही सध्या सावध भूमिका घेत आहेत. दुसरीकडे आ. सुभाष देशमुख यांनी आपण आपल्या कार्यकर्त्यांना भाजप म्हणूनच संधी देणार असल्याचे सांगत जे येतात त्यांना घेऊ असे सांगितले आहे. त्यामुळे निवडणुकीबाबतचा सपेन्स आणखीनच वाढला आहे. दरम्यान, दिलीप माने यांनीही आपल्या गटाच्या इच्छुकांना वेट ॲन्ड वॉचचा सल्ला देत आपली भूमिका गुलदस्त्यात ठेवली आहे.



CMYK